महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

# महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com


जा.क्र. महाज्योती, नागपूर/आस्था/2641/2023-24, दिनांक :-04/12/2023

## MPSC Group B & C-2023-24 परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी पुणे, छत्रपती संभाजीनगर येथील प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता परिपत्रक

महाज्योती या संस्थेद्वारे MPSC Group B & C-2023-24 परीक्षा पूर्व प्रशिक्षण करीता दि.25/11/2023 रोजी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी दि.01/12/2023 रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्था निवड करण्यास कळविण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांनी निवडलेल्या प्रशिक्षण केंद्रानुसार विद्यार्थ्यांची यादी महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

निवड यादीतील विद्यार्थ्यांनी **भगीरथ स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे,एच.व्हि. देसाई, पुणे, संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, पुणे व रिलायबल स्पर्धा परीक्षा केंद्र, छत्रपती संभाजीनगर**, येथे **दि.05/12/2023 ते दि.15/12/2023** रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्रास प्रवेश प्रक्रीया पूर्ण करुन घ्यावी.

प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-

1) आधार कार्ड
2) जातीचा दाखला
3) रहिवासी दाखला / Age, Domicile, Nationality दाखला
4) वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
5) पदवीचे प्रमाणपत्र/गुणपत्रक
6) दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र
7) अनाथ असल्यास प्रमाणपत्र
8) स्वयंघोषणापत्र

**प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता-संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे:-**

1) **भगीरथ स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**
   **पत्ता** :- 2 रा मजला, केसरीवाडा, नारायण पेठ, पुणे - 30.क्लास रुम नं. 1 - आकृती संकुल, टिळक रोड, पुणे - 411030
   **संपर्क क्र.** 1) 9090906777, 2) 9970298197
2) **एच.व्हि. देसाई, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**
   **पत्ता** :- एच.व्हि. देसाई स्पर्धा परीक्षा केंद्र, शनिवारवाडा मागे, सकाळ प्रेस शेजारी, पुणे -02
   **संपर्क क्र.** स्वरुपा मॅडम. 1) 9511635931, 2) 9168256825

3) **संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**
पत्ता :- संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, स्पर्धा परीक्षा भवन, गणेश नगर, गल्ली क्रमांक 23, धायरी, पुणे
संपर्क क्र. 1) श्री. पवनकुमार चव्हाण सर (9028817369)

4) **रिलायबल स्पर्धा परीक्षा केंद्र, छत्रपती संभाजीनगर,येथील प्रशिक्षण केंद्र -**
**पत्ता** :- पैठण गेट - निराला बाजार रोड, युनियन बँकच्या जवळ, छत्रपती संभाजीनगर.
**संपर्क क्र**. प्रदीप पाटील सर 1)8308200440, 2)7350240655

**रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना:-**

- प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांची निवड **UPSC, MPSC राज्यसेवा** मधे झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी कुठल्याही एकाच प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण संस्थेस रूजू व्हावे.
- प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
- कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी'या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

स्वा
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर